# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र- १०६** **दिनांक :- २१/०८/२०२६**

## " पिंपळगाव हरे पोलिसांच्या प्रभावी तपास व न्यायालयीन पाठपुराव्याला यश "

### मारहाण व शेतात अनधिकृत प्रवेश प्रकरणात ०५ आरोपी दोषी; न्यायालयाकडून १०,०००/- रुपये दंडाची शिक्षा

===000===

**पिंपळगाव हरे. पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा रजि. नं. ५५/२०२२, भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ४४७, ४५२, ५०४, ५०६, ४०३ अन्वये दाखल प्रकरणाचा मा. न्यायालय, पाचोरा येथे दिनांक २०/०८/२०२६ रोजी निकाल लागला असून, सदर प्रकरणात ०५ आरोपींना दोषी ठरविण्यात आले असुन, त्यांना एकुण १०,०००/- रुपयेचा दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.**

सदर प्रकरणाची सुनावणी **मा. न्यायाधिश जी. एस. बोरा, न्यायिक दंडाधिकारी, पाचोरा** यांच्या न्यायालयात झाली. सदर प्रकरणात फिर्यादी विजय भाऊसिंग परदेशी असून **आरोपी रमेश गुलचंद परदेशी व इतर ४** यांच्याविरुद्ध RCC No. १४३/२०२२ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

मा. न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(२) अन्वये आरोपींना **भा.दं.वि. कलम १४९, ३२३, ४४७ व ४२७ अन्वये दोषी ठरविले. आरोपींना फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून रु. १०,०००/- दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच आरोपींना चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्रावर सोडण्याचा आदेश देण्यात आला.** सदर प्रकरणात एकूण **१२ साक्षीदार तपासण्यात आले.** यामध्ये फिर्यादी, पंच तसेच वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली.

**सदर प्रकरणात मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक चाळीसगांव परिमंडळ, तसेच श्री. बापु रोहम, उप विभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा विभाग, पाचोरा यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळगांव हरे. पोलीस स्टेशनचे महिला सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती कल्याणी वर्मा यांनी प्रकरणात महत्वाची भुमीका बजवत साक्षीदार यांना वेळो-वेळी न्यायालयात हजर राहून प्रभावी साक्ष देतील यासाठी विशेष प्रयत्न केले आहे. सदर गुन्हयांचा तपास पोहेकॉ/२६२३ अरविंद मोरे यांनी केला सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. चंद्रकांत नाईकवाडे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. तसेच मनोज व्ही. माने यांनी प्रकरणाच्या कामकाजात सहकार्य केले असुन, सदर प्रकरणात पैरवी अधिकारी पोहेकॉ/ ९२० दीपक प्र. पाटील यांनी न्यायालयीन पैरवीचे काम पाहिले, तर केस वॉच पोहेकॉ/ २९०३ विकास सूर्यवंशी यांनी केस वॉचचे कामकाज पाहिले.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

*************************************************************************